**रामदेव ऐंटरप्राईजेस, मुंबई यांचेविरुध्द चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**आदेश क्रमांकः एसटीवाय-४०२६/प्र.क्र.४९/२०२६/मंआस्था-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २ एप्रिल, २०२६

**संदर्भ :-** शासन निर्णय, उद्योग,उर्जा व कामगार विभाग, क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग - III/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६

**शासन आदेश :-** या विभागामार्फत संगणक सामग्री व लेखनसामग्री पुरवठा करण्यासाठी पुरवठादाराची नियुक्ती करणेबाबत ई निविदा क्र.२०२५_GADM_१२५४९९५_१ दि.०३.१२.२०२५ अन्वये निविदा मागविण्यात आली होती. यानुषंगाने रामदेव ऐंटरप्राईजेस, शॉप नं. ३, श्रीनाथ भवन, ३७/४३, बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०००01. यांनी निविदा सादर करताना जीएसटी फाईल केल्याबाबतचे खोटे प्रमाणपत्र सादर केल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यामुळे सदर प्रकरणी चौकशी करणे आवश्यक असल्याने उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दि.०१.१२.२०१६ सोबतच्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका मधील नियम ५.४ नुसार सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी श्री. सुनिल तुमराम, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

श्री.सुनिल तुमराम, अवर सचिव यांनी आपले नियमित कामकाज सांभाळून सदर चौकशीचे कामकाज एक महिन्यात पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल सचिव व वि.चौ.अ. (२) यांना सादर करावा.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४०२१३००२६१५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DEVIDAS SANDUJI BHAGURE

Digitally signed by DEVIDAS SANDUJI BHAGURE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=0990ae5e49835c85a735703503a82e3cd3cdde019c8ce2fdb9c7765ef1b7c39f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2D19FEFD30011466572B4E69158C3099ADDED4CBB59D6833F72ED93F73A564DC, cn=DEVIDAS SANDUJI BHAGURE
Date: 2026.04.02 13:01:55 +05'30'

**( दे. सां. भगुरे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. श्री.सुनिल तुमराम, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. रामदेव ऐंटरप्राईजेस, शॉप नं. ०३, श्रीनाथ भवन, ३७/४३, बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०००01.

**प्रत,**

१. सचिव व वि.चौ.अ. (२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. उप सचिव (मंआस्था-२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. निवडनस्ती / मंआस्था-२.